# मिरा भाईंदर महानगरपालिका

## माहिती व जनसंपदा विभाग

## प्रसिद्धी पत्रक

❖ **मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना सेवाअंतर्गत सुधारित आश्वासित प्रगती [१० वर्ष, २० वर्ष आणि ३० वर्ष] योजनेचा लाभ**

मिरा भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद अ.शर्मा ( भा. प्र. से.) यांच्या निर्देशानुसार आणि अतिरिक्त आयुक्त डॉ.संभाजी पानपट्टे व उपायुक्त ( मुख्यालय)श्रीम. कल्पिता पिंपळे यांच्या मार्गदर्शनाखाली एक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे.आज दि. २८ ऑक्टोबर २०२५ रोजी विभागीय पदोन्नती निवड समितीच्या बैठकीत सेवाअंतर्गत सुधारित आश्वासित प्रगती योजनेचा पहिला लाभ १२ कर्मचारी व दुसरा लाभ ५५ कर्मचारी याप्रमाणे एकूण ६७ कर्मचाऱ्यांना लाभ देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेने आतापर्यंत कालबद्ध पदोन्नतीसाठी पात्र असणाऱ्या १२६६ अधिकारी /कर्मचाऱ्यांपैकी ६६८ अधिकारी कर्मचाऱ्यांना सेवा अंतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ दिलेला असून उर्वरित कर्मचाऱ्यांनाही लाभ देण्यासाठी कार्यवाही प्रस्तावित केलेली आहे. मिरा भाईंदर महानगरपालिका आपल्या कर्मचारी परिवाराच्या कर्तुत्वाचा नेहमीच गौरव करत असते. या पदोन्नतीमुळे अधिकारी व कर्मचारी वर्गात आनंद आणि समाधानाचे वातावरण आहे. या पदोन्नतीमुळे कर्मचारी वर्ग कामाप्रती अधिक प्रेरित होईल आणि मिरा भाईंदर महानगरपालिका प्रशासन अधिक सक्षम व कार्यक्षम बनण्यास मदत होईल असा विश्वास मिरा -भाईंदर महानगरपालिका प्रशासनाला आहे.या पदोन्नती मिळालेल्या सगळ्या अधिकारी /कर्मचाऱ्यांचे मा.आयुक्तांनी अभिनंदन केले आहे. तसेच मिरा भाईंदर महानगरपालिका अधिकारी व कर्मचारी यांनी मिरा भाईंदर प्रशासनाचे व मा. आयुक्तांचे आभार मानले आहेत.